# इटली येथील स्केटिंग स्पर्धेत भारताला मिळालेले ब्रांज पदक खंडोबा चरणास स्पर्श

## महाराष्ट्रकन्या श्रुती, वैदही सरोदे भगिनीची भरारी



**पुणे । प्रतिनिधी**

नुकत्याच झालेल्या इटली देशांतील जागतीक स्केटिंग स्पर्धेत भारताला ब्रांस पदक मिळून देणाऱ्या शिवछत्रपति पुरस्कार प्राप्त कु श्रुतीका आणि वैदेही सरोदे यांनी आपल्या आईसह भारतीय लोकदैवत आणि सरोदे परिवाराचे कुलस्वामी असलेल्या जेजुरीच्या खंडोबा म्हाळसा देवतांचे दर्शन घेत पदक आणि पुरस्कार चिन्ह खंडोबा चरणी स्पर्श केलं. याप्रसंगी मराठी चित्रपट टिव्ही मालिका ज्येष्ठ अभिनेत्री प्रज्ञा जावळे एडकेआपल्या कन्यासह आणि बालकलाकार दर्श खेडेकर श्री मार्तंड देवसंस्थान विश्वस्त डॉ राजेन्द्र खेडकर. उपस्तीत. होते श्रुतिका सरोदे हीच्या कॅप्टनसी नेतृतवा खाली भारताने हे मिडल मिळवले आहे तीन आणि तिची छोटी बहिणीने भारतासाठी एक नवा ईतिहास रचला असल्याने या महाराष्ट्र कन्यानांच जगभर कौतुक होत आहे. या चुरशीच्या लढतीत भारताने चीनवर विजय मिळविला. जेजुरी खंडोबा मंदिरात श्री मार्तंडदेवसंस्थाने च्या वतीन अभिनेत्री प्रज्ञा जावळे एडके यांच्या हस्ते खंडोबा प्रतिमा देऊन सन्मानीत करण्यातआले. रोलर डर्बी खेळासाठी भारताला यापूर्वी कोणतेही मेडल प्राप्त झाले नव्हते. श्रुति. वैदेही या भगिनींनी कुळदैवताला प्रार्थना करत भंडार उधळून पुढील गोल्ड मिडल मिळवण्या करीता आशीर्वाद घेतला.

---

निवडणूक निर्णय अधिकारी तथा सहकार अधिकारी श्रेणी-२
संलग्न, उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड
निवडणूक कार्यक्रम जाहिर प्रगटन

मा. राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे आदेश दि.१८/०६/२०२४ व मा. तालुका सहकारी निवडणूक अधिकारी बीड यांनी मान्यता दिल्यानुसार मी एस. जे. जाधव निवडणूक निर्णय अधिकारी, सौ. के. एस. के. महाविद्यालय कर्मचारी सहकारी पतसंस्था म. बीड ता. जि. बीड या संस्थेच्या सन २०२५-२०३० या कालावधीचा संचालक मंडळाच्या निवडणूकीचा कार्यक्रम दि.१०/०१/२०२५ पासून प्रसिध्द करीत आहे. त्याचा तपशिल पुढील प्रमाणे आहे.

| अ.क्र | तपशिल | दिनांक व वेळ | ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | अर्ज विक्री व स्विक्रती | दि.१३/०१/२०२५ ते १७/०१/२०२५ वेळ सकाळी ११.०० ते दु. ०३.०० वा. | मा. उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड यांचे कार्यालय |
| २ | अर्ज छाननी | दि.२०/०१/२०२५ स. ११.०० वा | वरिल प्रमाणे |
| ३ | अर्ज माघार | दि. २१/०१/२०२५ ते दि. ०४/०२/२०२५ स. ११.०० ते दु. ०३.०० वा | वरिल प्रमाणे |
| ४ | मतदान दिनांक | दि. १६/०२/२०२५ स.०८.०० ते ०४.०० वा. पर्यंत | सौ. के.एस.के महाविद्यालय, बीड |
| ५ | निकाल जाहिर | दि. १६/०२/२०२५ रोजी मतमोजणी संपताच | सौ. के.एस.के महाविद्यालय, बीड |

तरी संस्थेच्या सर्व मतदारांना कळविण्यात येते की, संपूर्ण निवडणूक कार्यक्रमाशी संबंधीत माहिती प्राप्त करण्यासाठी निवडणूकक अधिकारी यांचे कार्यालयाशी संपर्क साधावा.

दि.१०/०१/२०२५

(स्वाक्षरीत)
(एस. जे. जाधव)
निवडणूक निर्णय अधिकारी
संलग्न, उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड

---

## जाहीर सूचना

### जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख बीड यांचे कार्यालय

**शासकीय इमारत, चांदमारी वसाहत, धानोरा रोड, बीड ४३११२२**
**क्रमांक/आस्था-२/एस.आर७१/२०२४, बीड दिनांक ०६/०१/२०२५**

प्रति, १. मल्हारी आश्रुबा जगताप,रा. शिंदी ता.केज जि. बीड- अपिलदार

**विरूद्ध**

१. कारभारी जयवंता केदार, २. आनंता जयवंता केदार, ३. त्रिंबक जयवंता धुमक, ४. मुक्ताबाई उत्तम केदार, ५. सुरेखा बाळासाहेब, ६. सिंधुबाई अंकुश, ६. कडुबाई वैजनाथ, ७. नवनाथ रंगनाथ क्षिरसागर, ८. बळीराम भगवान केदार, ९. प्रकाश बाबासाहेब वायकसे, अ.पा.क. बाबासाहेब ज्ञानोबा वायकसे, १०. आदित्य बाबासाहेब वायकसे, अ.पा.क. बाबासाहेब ज्ञानोबा वायकसे, ११. प्रतिक पंडीत अ.पा.क. पंडीतराव -ज्ञानोबा वायकसे, १२. विनायक राजेंद्र कदम, १३. सर्जेराव बाजीराव कदम, १४. संतराम बाजीराव कदम, १५. रमेश जालिंधर कदम, १६. बाबु बाजीराव कदम, १७. मच्छिंद्र जालींधर कदम, १८. गवळणबाई भागवत जगताप, १९. त्रंबक प्रभाकर धुमक, २०.अंकुश बाबु पारवे, २१.नवनाथ रंगनाथ क्षिरसागर, २२. बाबासाहेब गिरजा भारडे, २३.लक्ष्मण बाबु पारवे, २४.बाबासाहेब हरीभाउ जगताप, २५. सर्जेराव बाजीराव कदम, २६. संतराम बाजीराव कदम, २७. विकास सदाशिव पाटुळे, २८. विश्वांभर गिरजा भारड, २९.केशरबाई अंकुश पारवे, ३०. सुरेश भगवान जगताप, ३१. चंद्रकला सुभाष जाधव, ३२. बाबु बाजीराव कदम, वरील सर्व राहणार शिंदी, ता. केज जि. बिड, ३३. पोटहिस्सा मोजणी अधिकारी तथा उप अधीक्षक भूमि अभिलेख, गेवराई -जाबदार

या जाहिर सुचनेद्वारे सुचित करण्यात येते की, अर्जदार यांनी गैरअर्जदार यांचेविरूद्ध जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख बीड यांचे न्यायालयात मौजे शिंदी, ता. केज. जि. बीड येथील सर्वे नंबर ३५ मधील पोटहिस्सा मोजणीचा अंमल घेवुन कमी करण्यात आलेल्या क्षेत्राची दुरूस्ती करणे बाबत अपील महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६ चे कलम २४७ अन्वये अपील अर्ज दाखल केलेले आहे.

वरील गैरअर्जदार यांना जाहिर सुचनेद्वारे कळविण्यात येते की, वरील प्रकरणी दिनांक ०५/०२/२०२५ रोजी वेळ सकाळी ११.३० वाजता जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख बीड यांचे कायालय, चांदमारी वसाहत, पालवण चौकाजवळ, धानोरा रोड, बीड ता.जि.बीड यांचे समोर सुनावणी आहे. वरील नमुद गैरअर्जदार यांनी नमुद तारखेस न्याय कक्षेत सुनावणीस उपस्थित रहावे.

वरील नमुद गैरअर्जदार वरील नमुद तारखेस गैरहजर राहील्यास प्रकरणात एकतर्फी सुनावणी घेण्यात येईल व प्रकरण पुढे चालविण्यात येईल याची नोंद घ्यावी.

शिक्का

**(स्वाक्षरीत)**
**कृष्णा शिंदे**
**जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, बीड**

---

## जाहीर प्रगटन

### मा. श्री. एम. आय. एस. दर्यावर्दी, ७ वे दिवाणी न्यायाधीश क. स्तर, बीड, ता. जि. बीड यांचे न्यायालयात

**किरकोळ दिवाणी अर्ज क्र.६२/ २०२५**
**ॲड. आर. डी. आरसुळ यांचे मार्फत**
**शेख जाफर व ईतर वि. निरंक**

ज्याअर्थी, **शेख हमीदा जाफर**, हया दिनांक १५/०४/२०२४ रोजी कुर्ला, ता. जि. बीड येथे मयत झालेले आहेत त्याअर्थी,

१. शेख जाफर शेख गुलाब, वय- ७९, धंदा- शेती रा. कुर्ला, ता. जि. बीड

२. शेख मुसा जाफर, वय- ५७, धंदा- शेती रा. कुर्ला, ता. जि. बीड

अर्जदार क्र. १ हा मयताचा मयत यांचे पती आहेत व अर्जदार क्र. २ हा मुलगा आहे. असे वरील अर्जदारांचे म्हणणे आहे. वरील अर्जदार यांनी ते मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा सदरहु अर्जदार हे मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट, सदरहु अर्जदारांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा/ अर्जदारांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना/ अर्जदारांना सदरहु मयत नामे, यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**प्रकरणाची पुढील तारीख १३/०२/२०२५ ही आहे.**

आज दिनांक ०९/०१/२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

(स्वाक्षरीत)
क.लिपीक

शिक्का

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)**
**अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड**

---

## जाहीर प्रगटन

### कार्यालय, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, बीड

**घर नंबर १-४-१६००, उत्तमनंदा बिल्डींग, पहिला मजला, अंबिका चौक, पांगरी रोड, शाहु नगर, बीड ता. जि. बीड पिन ४३११२२**
**जावक क्र. २३, दिनांक ०६/०१/२०२५**
**तक्रार क्रमांक : - ६५८/२०२४**

अर्जदार :- शाम नानकराम वर्मा.

विरुध्द

गैरअर्जदार :- १. शाखाधिकरी,

ज्ञानराधा मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडीट सोसायटी लि. बीड, शाखा मोंढा, बीड ता. जि. बीड २. मुख्य कार्याकारी अधिकारी, ज्ञानराधा मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडीट सोसायटी लि. बीड, मुख्य कार्यालय ज्ञानराधा भवन जालना रोड, बीड, ता.जि. बीड

वर नमुद तक्रारदार यांना विरुध्द पक्ष यांच्या विरुध्द ग्राहक संरक्षण कायद्यान्वये वर नमुद तक्रार दाखल केलेली आहे. यातील विरुध्द पक्ष यांना नोटीस पाठविली असता ते स्विकारत नाही / पत्ता बदल झालयामुळे मिळुन येत नाही. म्हणून तक्रारदारांनी केलेल्या विनंतीनुसार या जाहिर नोटीस व्दारे आपणास कळविण्यात येते की, विरुध्द पक्ष यांनी वर नमुद या आयोगाच्या पत्यावर दिनांक १७/०१/२०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता स्वता अगर वकिल किंवा प्राधिकृत प्रतिनिधि मार्फत उपस्थित राहून आपला लेखी जबाब, पुरावा व प्रतिज्ञालेख दाखल करावेत. विरुध्द पक्षांनी याकामी कसूर केल्यास मा. आयोगाव्दारे एकतर्फा आदेश पारित करणेत येवुन पुढील कार्यवाही करण्यात येईल याची दखल घ्यावी.

मा.जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, बीड यांची आदेशानुसार.

दिनांक- ०६/०१/२०२५
ठिकाण - बीड

**(स्वाक्षरीत)**
**प्रबंधक**
**जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, बीड**

शिक्का

---

## जाहीर प्रगटन

### तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात

**जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण अर्ज नं. २६४/२०२४**
**विनोद शिवाजी नलावडे विरुद्ध ग्रा.पं. आहेरचिंचोली**

पहा

१. विनोद शिवाजी नलावडे, रा. आहेरचिंचोली ह. मु. लोळदगाव ता.गेवराई जि.बीड

उपरोक्त प्रमाणे जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून मयत भाऊराव बाबाजी नलावडे यांचा दिनांक ०१/०२/१९६० रोजी मृत्यू झालेला असून त्यांचे मृत्यूची नोंद जन्म-मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार यास मृत्यु यांच्या नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प.कार्यालयास आहेर चिंचोली ता.बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर हया जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन,त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मृत्यु नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे आहेर चिंचोली ता.जि.बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १२/१२/२०२४ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले.

सदर प्रकरणात पुढील तारीख १०/०१/२०२५ ही आहे.

शिक्का

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)**
**तहसिलदार, बीड**

---

## जाहीरनामा

### तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे कार्यालय माजलगांव जि.बीड

**जा.क्र.२०२४/दंड विभाग/जन्म-मृत्यू नोंद/का.वि. १२७४**
**दि. २८/११/२०२४**

**जन्म-मृत्यु नोंदणी प्रमाणपत्र मिळणेबाबत**
**जन्म-मृत्यु नोदणी (सुधारणा) कायदा २०२३ मधील कलम ११ अन्वये**

सर्व जनतेस याद्वारे जाहीर केले जाते की, अर्जदार **अर्जुन हरीभाऊ चव्हाण रा. मोगरा (माळतांडा) ता. माजलगांव जि.बीड** यांनी स्वतःच्या मुलाच्या नावे पृथ्वीराज अर्जुन चव्हाण यांचा जन्म दिनांक ०७/०६/२००८ रोजी मोगरा ता. माजलगांव, जि.बीड येथे झाला असुन अर्जदार यांनी सदर जन्माची नोंद ग्रामपंचायत कार्यालय मोगरा ता. माजलगांव, बीड यांचे नोंदवहीमध्ये घेऊन प्रमाणपत्र मिळावे म्हणून या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

करिता सदरहु अर्जदार यांची जन्मतारीख व जन्मठिकाण कायदेशीर नाही, असे कोणास या कार्यालयाचे निदर्शनास आणून द्यावयाचे असेल तर या जाहिरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत त्याने या कार्यालयात हजर राहुन आपल्या हरकती कळवाव्यात. तसेच आपणांस कळविण्यात येते की, जर विहीत मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखवल्या तर सदर कार्यालय सदरहू अर्जदार यांच्या हक्काबदल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शावीत झाल्यास अर्जदारांचे स्वतः च्या नातलगांच्या जन्माबाबत नोंद कायदेशीर असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्याचे अनुषंगाने विहित कार्यवाही करण्यात येईल.

आज दि. २८/११/२०२४ रोजी माझे सही व शिक्यानिशी दिला.

शिक्का

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)**
**कार्यकारी दंडाधिकारी तथा**
**नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय**
**माजलगांव**

---

## जाहीर प्रगटन

### कार्यालय, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, बीड

**घर नंबर १-४-१६००, उत्तमनंदा बिल्डींग, पहिला मजला, अंबिका चौक, पांगरी रोड, शाहु नगर, बीड ता. जि. बीड पिन ४३११२२**
**जावक क्र. २४, दिनांक ०६/०१/२०२५**
**तक्रार क्रमांक : -६५९/२०२४**

अर्जदार :- प्रकाश कचरू नेवडे.

विरुध्द

गैरअर्जदार :- १. शाखाधिकरी,

ज्ञानराधा मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडीट सोसायटी लि. बीड, शाखा मोंढा, बीड ता. जि. बीड २. मुख्य कार्याकारी अधिकारी, ज्ञानराधा मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडीट सोसायटी लि. बीड, मुख्य कार्यालय ज्ञानराधा भवन जालना रोड, बीड, ता.जि. बीड

वर नमुद तक्रारदार यांना विरुध्द पक्ष यांच्या विरुध्द ग्राहक संरक्षण कायद्यान्वये वर नमुद तक्रार दाखल केलेली आहे. यातील विरुध्द पक्ष यांना नोटीस पाठविली असता ते स्विकारत नाही / पत्ता बदल झालयामुळे मिळुन येत नाही. म्हणून तक्रारदारांनी केलेल्या विनंतीनुसार या जाहिर नोटीस व्दारे आपणास कळविण्यात येते की, विरुध्द पक्ष यांनी वर नमुद या आयोगाच्या पत्यावर दिनांक १७/०१/२०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता स्वता. अगर वकिल किंवा प्राधिकृत प्रतिनिधि मार्फत उपस्थित राहून आपला लेखी जबाब, पुरावा व प्रतिज्ञालेख दाखल करावेत. विरुध्द पक्षांनी याकामी कसूर केल्यास मा. आयोगाव्दारे एकतर्फा आदेश पारित करणेत येवुन पुढील कार्यवाही करण्यात येईल याची दखल घ्यावी.

मा. जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, बीड यांची आदेशानुसार.

दिनांक- ०६/०१/२०२५
ठिकाण - बीड

**(स्वाक्षरीत)**
**प्रबंधक**
**जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, बीड**

शिक्का

---

## जाहीर प्रगटन

### कार्यालय, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, बीड

**घर नंबर १-४-१६००, उत्तमनंदा बिल्डींग, पहिला मजला, अंबिका चौक, पांगरी रोड, शाहु नगर, बीड ता. जि. बीड पिन ४३११२२**
**जावक क्र. २५, दिनांक ०६/०१/२०२५**
**तक्रार क्रमांक : -६६०/२०२४**

अर्जदार :- रुक्मिणी प्रकाश नेवडे.

विरुध्द

गैरअर्जदारः- १. शाखाधिकरी,

ज्ञानराधा मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडीट सोसायटी लि. बीड, शाखा मोंढा, बीड ता. जि. बीड २. मुख्य कार्याकारी अधिकारी, ज्ञानराधा मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडीट सोसायटी लि. बीड, मुख्य कार्यालय ज्ञानराधा भवन जालना रोड, बीड, ता.जि. बीड

वर नमुद तक्रारदार यांना विरुध्द पक्ष यांच्या विरुध्द ग्राहक संरक्षण कायद्यान्वये वर नमुद तक्रार दाखल केलेली आहे. यातील विरुध्द पक्ष यांना नोटीस पाठविली असता ते स्विकारत नाही / पत्ता बदल झालयामुळे मिळुन येत नाही. म्हणून तक्रारदारांनी केलेल्या विनंतीनुसार या जाहिर नोटीस व्दारे आपणास कळविण्यात येते की, विरुध्द पक्ष यांनी वर नमुद या आयोगाच्या पत्यावर दिनांक १७/०१/२०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता स्वता. अगर वकिल किंवा प्राधिकृत प्रतिनिधि मार्फत उपस्थित राहून आपला लेखी जबाब, पुरावा व प्रतिज्ञालेख दाखल करावेत. जर विरुध्द पक्षांनी याकामी कसूर केल्यास मा. आयोगाव्दारे एकतर्फा आदेश पारित करणेत येवुन पुढील कार्यवाही करण्यात येईल याची दखल घ्यावी.

मा.जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, बीड यांची आदेशानुसार.

दिनांक- ०६/०१/२०२५
ठिकाण - बीड

**(स्वाक्षरीत)**
**प्रबंधक**
**जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, बीड**

शिक्का

---

## जाहीर प्रगटन

### कार्यालय, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, बीड

**घर नंबर १-४-१६००, उत्तमनंदा बिल्डींग, पहिला मजला, अंबिका चौक, पांगरी रोड, शाहु नगर, बीड ता. जि. बीड पिन ४३११२२**
**जावक क्र. २६, दिनांक ०६/०१/ २०२५**
**तक्रार क्रमांक : -६६१/२०२४**

अर्जदार :- १. चंदनबाई कचरू नेवडे.

विरुध्द

गैरअर्जदार :- १. शाखाधिकरी,

ज्ञानराधा मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडीट सोसायटी लि. बीड, शाखा मोंढा, बीड ता. जि. बीड २. मुख्य कार्याकारी अधिकारी, ज्ञानराधा मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडीट सोसायटी लि. बीड, मुख्य कार्यालय ज्ञानराधा भवन जालना रोड, बीड, ता. जि. बीड

वर नमुद तक्रारदार यांना विरुध्द पक्ष यांच्या विरुध्द ग्राहक संरक्षण कायद्यान्वये वर नमुद तक्रार दाखल केलेली आहे. यातील विरुध्द पक्ष यांना नोटीस पाठविली असता ते स्विकारत नाही / पत्ता बदल झालयामुळे मिळुन येत नाही. म्हणून तक्रारदारांनी केलेल्या विनंतीनुसार या जाहिर नोटीस व्दारे आपणास कळविण्यात येते की, विरुध्द पक्ष यांनी वर नमुद या आयोगाच्या पत्यावर दिनांक १७/०१/२०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता स्वता. अगर वकिल किंवा प्राधिकृत प्रतिनिधि मार्फत उपस्थित राहून आपला लेखी जबाब, पुरावा व प्रतिज्ञालेख दाखल करावेत. जर विरुध्द पक्षांनी याकामी कसूर केल्यास मा. आयोगाव्दारे एकतर्फा आदेश पारित करणेत येवुन पुढील कार्यवाही करण्यात येईल याची दखल घ्यावी.

मा. जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, बीड यांची आदेशानुसार.

दिनांक - ०६/०१/२०२५
ठिकाण - बीड

**(स्वाक्षरीत)**
**प्रबंधक**
**जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, बीड**

शिक्का

---

## जाहीर प्रगटन

### कार्यालय, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, बीड

**घर नंबर १-४-१६००, उत्तमनंदा बिल्डींग, पहिला मजला, अंबिका चौक, पांगरी रोड, शाहु नगर, बीड ता. जि. बीड पिन ४३११२२**
**जावक क्र. २७, दिनांक ०६/०१/२०२५**
**तक्रार क्रमांक : -६६२/२०२४**

अर्जदार :- १. कैलास नारायण राउत.

विरुध्द

गैरअर्जदारः- १.शाखाधिकरी,

ज्ञानराधा मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडीट सोसायटी लि. बीड, शाखा मोंढा, बीड ता. जि. बीड २. मुख्य कार्याकारी अधिकारी, ज्ञानराधा मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडीट

सोसायटी लि. बीड, मुख्य कार्यालय ज्ञानराधा भवन जालना रोड, बीड, ता.जि. बीड

वर नमुद तक्रारदार यांना विरुध्द पक्ष यांच्या विरुध्द ग्राहक संरक्षण कायद्यान्वये वर नमुद तक्रार दाखल केलेली आहे. यातील विरुध्द पक्ष यांना नोटीस पाठविली असता ते स्विकारत नाही / पत्ता बदल झालयामुळे मिळुन येत नाही. म्हणून तक्रारदारांनी केलेल्या विनंतीनुसार या जाहिर नोटीस व्दारे आपणास कळविण्यात येते की, विरुध्द पक्ष यांनी वर नमुद या आयोगाच्या पत्यावर दिनांक १७/०१/२०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता स्वता. अगर वकिल किंवा प्राधिकृत प्रतिनिधि मार्फत उपस्थित राहून आपला लेखी जबाब, पुरावा व प्रतिज्ञालेख दाखल करावेत. जर विरुध्द पक्षांनी याकामी कसूर केल्यास मा. आयोगाव्दारे एकतर्फा आदेश पारित करणेत येवुन पुढील कार्यवाही करण्यात येईल याची दखल घ्यावी.

मा.जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, बीड यांची आदेशानुसार.

दिनांक - ०६/०१/२०२५
ठिकाण- बीड

**(स्वाक्षरीत)**
**प्रबंधक**
**जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, बीड**

शिक्का

# विभागीय क्रीडा स्पर्धांमध्ये बीड जिल्ह्याचा नाव लौकिक वाढवा : जिल्हाधिकारी अविनाश पाठक

**बीड । प्रतिनिधी**

दिनांक ९ जानेवारी रोजी बीडचे जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांच्या अध्यक्षतेखाली जालना येथे होणाऱ्या विभागीय क्रीडा स्पर्धा नियोजनासाठी पूर्वतयारी बैठक पार पडली. या बैठकीसाठी निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी , उपजिल्हाधिकारी शैलेश सूर्यवंशी , महेंद्रकुमार कांबळे , अरविंद लाटकर , कविता जाधव , फातेमा शेख , ओंकार देशमुख , तहसीलदार चंद्रकांत शेळके , नरेंद्र कुलकर्णी , अविनाश शिंगटे , तेजस्विनी जाधव , शिरूरचे तहसीलदार सुरेश घोळवे , माजलगावचे तहसीलदार संतोष रुईकर, शिरुरचे तहसीलदार सुरेश घोळवे व इतर अधिकारी , कर्मचारी उपस्थित होते . दरवर्षी महसूल विभागातर्फे विभागीय क्रीडा स्पर्धा व सांस्कृतिक स्पर्धा घेण्यात येतात . यावर्षीही फेब्रुवारी महिन्यात जालना येथे या स्पर्धा संपन्न होणार आहेत . या स्पर्धेसाठी पूर्वतयारी म्हणून आज ही बैठक आयोजित करण्यात आली होती.



जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी या स्पर्धेसाठी प्रोत्साहन दिले व जेव्हा आपण स्पर्धांमध्ये भाग घेतो तेव्हा कोणी जिल्हाधिकारी नाही किंवा कोणी कोतवाल नाही , प्रत्येक पदाच्या व्यक्तीला या स्पर्धेमध्ये भाग घ्यावा व जिल्ह्याचा मान वाढवावा असे म्हणून प्रोत्साहन दिले. या बैठकीमध्ये सर्व तालुक्यातील सहभाग घेऊ इच्छिणारे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते . जालना येथे होणाऱ्या सांस्कृतिक व क्रीडा स्पर्धांमध्ये वेगवेगळ्या प्रकारच्या स्पर्धा आयोजित करण्यात आल्या आहेत . त्यामध्ये क्रिकेट , फुटबॉल , हॉलीबॉल , खो-खो , कबड्डी, थ्रो बॉल अशा वेगवेगळ्या प्रकारच्या खेळांचा समावेश करण्यात आला आहे . तसेच सांस्कृतिक स्पर्धांमध्ये वैयक्तिक नृत्य , समूह नृत्य , गायन , नाटिका एकपात्री नाटिका अशा विविध प्रकारच्या स्पर्धांचा समावेश करण्यात आलेला आहे . त्यासाठीचे सखोल नियोजन करण्यासाठी ही बैठक आयोजित करण्यात आली होती . प्रत्येक प्रकारच्या स्पर्धासाठी एक समन्वय अधिकारी नेमून त्या त्या क्रीडा स्पर्धांमध्ये जास्तीत जास्त बक्षीसे मिळवण्याचा संकल्प करण्यात आला . बीड हा कलाकारांचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जाणारा जिल्हा आहे व तिथे कलाकारांची कुठलीच कमतरता नाही , त्यामुळे या स्पर्धांमध्ये बीड जिल्हा अव्वल क्रमांकावर येईल असा विश्वास उपजिल्हाधिकारी महेंद्र कुमार कांबळे यांनी केला . सांस्कृतिक कार्यक्रमांचे नेतृत्वही त्यांनी स्वीकारले. निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी संचलनाचे नेतृत्व स्वीकारले. सांस्कृतिक स्पर्धांमध्ये उत्कृष्ट गायन , उत्कृष्ट अभिनय, उत्कृष्ट वैयक्तिक नृत्य , वेशभूषा , नकला , वादक , दिग्दर्शक अशा प्रकारे प्रत्येक उत्कृष्ट कलाकृतीला गुण दिले जाणार आहेत . सांस्कृतिक कार्यक्रमासाठी प्रत्येक जिल्ह्यास ५० मिनिटे वेळ देण्यात येणार आहे . दरवर्षी या महसूल क्रीडा स्पर्धा दैनंदिन शासकीय कामापासून दूर राहणे व उत्साही होऊन पुन्हा जोमाने काम करणेस्तव लाभदायी ठरतात.

---

## आज आष्टीत आ.सुरेश धस यांची जिल्हाधिकारी बीड, यांच्या समवेत पाटबंधारे, जलसंधारण आणि कृषी विभागाच्या जिल्हास्तरीय अधिकाऱ्यां समवेत आढावा बैठकीचे आयोजन

# गेल्या दहा वर्षातील थंडावलेल्या विकास कामांना येणार गती

**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टी सन २०१४ नंतर, २०१८ मध्ये विधान परिषदे नंतर विधानसभा निवडणूक २०२४ मध्ये चौथ्यांदा आणि एकूण पाचव्यांदा विधानसभा सदस्य झालेले आ. सुरेश धस यांनी गेले दहा वर्षातील मंदावलेल्या विकास कामांना गती मिळावी यासाठी दूरदृष्टी ठेवून विकास कामाचे नियोजन केले असून.. आज जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांचे समवेत जिल्हास्तरीय विभागीय आणि उपविभागीय



अधिकारी यांच्या बैठकीचे आष्टी पंचायत समिती सभागृहामध्ये दुपारी ४.०० वाजता आयोजन करण्यात आले आहे. याबाबतची अधिक माहिती अशी की, आष्टी विधानसभा मतदारसंघ अंतर्गत आष्टी, पाटोदा आणि शिरूर (का.) तालुक्यातील.. पाटबंधारे विभाग, कृषी विभाग, जलसंधारण विभाग या विभागांचे जिल्हास्तरीय.. विभागीय आणि उपविभागीय अधिकारी, यांच्या समवेत आष्टी विधानसभा मतदारसंघातील काही प्रकल्पांची उंची वाढवणे.. कोल्हापुरी पद्धतीचे बंधारे यांची सद्यस्थिती, नव्याने मंजूर करण्यात आलेले कोल्हापूर पद्धतीचे बंधारे, बॅरेजेस, तसेच तलावांची दुरुस्ती, कालव्यांची दुरुस्ती, कृषी विभागाची जलसंधारणा ची कामे काही प्रकल्पांच्या भूसंपादनाची रखडलेली प्रक्रिया याबाबत या बैठकीमध्ये आढावा घेण्यात येणार आहे. निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी सर्व संबंधित विभागांना या बैठकीबाबत सूचित केले आहे.. या बैठकीमुळे आष्टी, पाटोदा आणि शिरूर (का) तालुक्यातील अनेक विकास कामे मंदगतीने सुरू होती त्यांना या उपाय योजनांमुळे गती मिळणार आहे असे दिसून येत आहे.

---

# गेवराईत 'स्त्री-पुरुष संयुक्त मालकी हक्क' प्रशिक्षण कार्यशाळा संपन्न

**गेवराई । प्रतिनिधी**

महिला आर्थिक विकास महामंडळ जिल्हा बीड द्वारा स्थापित तेजस्विनी लोकसंचलित साधन केंद्र गेवराई अंतर्गत राबविण्यात येत असलेल्या बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्पांतर्गत तेजश्री महिला शेतकरी उत्पादक कंपनी अंतर्गत सीआरपी, माविम मित्र मंडळ व सीएमआरसी स्टाफ यांच्या करिता दिनांक ९ जानेवारी २०२५ रोजी स्त्री पुरुष संयुक्त मालकी हक्क या विषयावरील एक दिवसीय प्रशिक्षण



कार्यशाळा कार्यक्रम आयोजित करण्यात आली होती. या प्रशिक्षण कार्यशाळेला प्रमुख मार्गदर्शक म्हणून सुखदेव चिंचोलीकर (जिल्हा समन्वयक अधिकारी, माविम बीड) राजेंद्र दौड (विभागीय सामाजिक विकास तज्ञ, स्मार्ट प्रकल्प छत्रपती संभाजीनगर) यांनी शेत जमीनीमध्ये महिलांचा समान हक्क यावर मार्गदर्शन केले. सदर प्रशिक्षणामध्ये लिंगभेद, पितृसत्ताक पद्धतीचा उगम कसा झाला व हिंदू वारसा हक्का संबधीचा कायदा तसेच जमीन हस्तांतरणाच्या प्रक्रिया यासंदर्भात मार्गदर्शन करण्यात आले. समूह आधारित संस्थेच्या महिलांना प्रकल्पामध्ये सामाजिक वर्गीकरणानुसार महिला संचालकांचे प्रमाण, महिला भागधारकांचे, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती तसेच अत्यल्पभूधारक शेतकरी यांचे योग्य प्रमाण घेऊन सामाजिक वर्गीकरण समतोल साधून सर्व समाजघटकांचा समावेश करावा असे आव्हान करण्यात आले.

---

# चिमुकल्यांनी भरवला आठवडी बाजार

**बीड । प्रतिनिधी**

प्रा.शा.नेमाने वस्ती तांबाराजूरी येथे बाल आनंद मेळावा आयोजित करण्यात आला होता.या बाल आनंद मेळाव्यात आठवडी बाजार भरवण्यात आला शाळेतील प्रत्येक विद्यार्थ्यांनी उस्फुर्त सहभाग घेत विविध भाजीपाला स्टॉल व खाद्यपदार्थ स्टॉल लावण्यात आले पालकांनी ही मोठ्या प्रमाणात उपस्थित राहून मुलांच्या मनात व्यावसायिक व व्यवहारिक दृष्टीकोन विकसित करण्यासाठी प्रत्येक स्टॉल वर जाऊन भाजीपाला व खाद्यपदार्थ खरेदी करून मुलांचे व्यवहारीक ज्ञान कसे आहे ते पडताळून पाहण्यासाठी असलेल्या वस्तूंची



खरेदी केली व पुढील काळात तंतोतंत व्यवहारात भर पडेल या हेतूने मुलांना मार्गदर्शन व उत्पादन व लागणार खर्च यांचा ताळमेळ बसून आपल्याला वस्तू किती रुपयांना विकली पाहिजे याचे ज्ञान कसे आहे पडताळणी करून घेत साहित्य खरेदी केले व सर्व पालकांनी सहभाग घेत आठवडी बाजार भरवण्यात आला याचा आनंद घेतला समाधान व्यक्त केले. या कार्यक्रमाचे उदघाटक म्हणून केंद्रीय मुख्याध्यापक तथा केंद्रप्रमुख श्री बापू मळेकर सर प्रमुख पाहुणे ग्रामपंचायत सदस्य श्री बबन दादा तांबे सौ.स्वाती गणेश भालेराव शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री पवन कदम.

---

# खो-खो स्पर्धेत मुलींच्या गटात जयभवानी विद्यालय विजेता तर शारदा विद्यामंदीर उपविजेता

**गेवराई । प्रतिनिधी**

जयभवानी आणि जगदंबा शिक्षण प्रसारक मंडळ अंतर्गत सुरू असलेल्या क्रीडा महोत्सवात जयभवानी विद्यालय शिवाजीनगरच्या भव्य मैदानावर आयोजित केलेल्या खो-खो स्पर्धेत शिवाजीनगर गढी येथील जयभवानी विद्यालयाच्या मुलीच्या संघाने बाजी मारत विजेतेपद पटकावले तर गेवराई येथील शारदा विद्यामंदिरचा संघ उपविजेता ठरला. स्पर्धा आयोजक रणवीर पंडित यांनी विजेत्यांचे अभिनंदन केले. शारदा स्पोर्ट्स अक्ॅडमीचे अध्यक्ष रणवीर पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली चौथा



क्रीडा महोत्सव गेवराई तालुक्यात मोठ्या उत्साहात सुरू आहे. क्रीडा महोत्सवाच्या पाचव्या दिवशी जयभवानी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय गढी येथे भव्य व्हॉलीबॉल स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेमध्ये सर्व साखळी सामने झाल्यानंतर जयभवानी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय गढी विरुद्ध शिवशारदा पब्लिक स्कूल शिवाजीनगर यांच्यात अंतिम सामना झाला. यात जयभवानीच्या संघाने अप्रतिम खेळी करत शिवशारदा पब्लिक स्कूलचा पराभव करून विजेतेपद पटकावले. संघात तागड ज्योती, मोहिते राधिका, ठोंबरे अमृता, पवार तनुजा ,शिंदे तेजस्विनी, शिंदे संध्या, मगर ज्ञानेश्वरी, गोंजारे राजेश्वरी, शेजुळ रोहिणी, बोर्ड प्रणाली, जाधव भाग्यश्री, शिंदे कांचन, चौधरी कल्याणी यांनी उत्कृष्ट कामगिरी केली. मुख्याध्यापक वसंत राठोड, क्रिडाशिक्षक आडे, गिरी, देशमुख यांचे मार्गदर्शन लाभले.

---

## सर्व कार्यालयानी गतिमानता अभियाना अंतर्गत सप्तसुत्री कार्यक्रम राबविण्याचे आवाहन

**बीड । प्रतिनिधी**

प्रशासनाच्या सेवांच्या गुणवतेमध्ये वाढ, लोकाभिमुखता, निर्णयशिलता आण्याण्यासाठी सर्वांच्या सहकार्यातुन उत्तम प्रशासन कार्यान्वित कार्यालयीन गतिमानता अभियान १ जानेवारी ते ३० एप्रिल २०२५ या कालावधीत बीड जिल्हयातील सर्व शासकीय, निमशासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था, शासन अंगीकृत उपक्रम सप्तसुत्री कार्यक्रम कार्यालयात राबवावे, असे आवाहन जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी केले आहे.

---

# राजमाता जिजाऊ क्रिकेट अकॅडमीच्या नुमान शेखची विद्यापीठ झोन क्रिकेट स्पर्धेसाठी निवड

## राजस्थानच्या कोटा येथे होणार स्पर्धा

**आष्टी । प्रतिनिधी**

तालुक्यातील साबलखेड येथील नुमान शेख याची कोटा (राजस्थान) येथे होणाऱ्या विद्यापीठ झोन इंडिया क्रिकेट स्पर्धेसाठी नुकतीच निवड झाली आहे.

नुमान शेख याने कठोर सराव व अचूक कौशल्याने क्रिकेटमध्ये प्राविण्य मिळवले आहे. त्याची ही निवड म्हणजे राजमाता जिजाऊ अक्ॅडमीच्या प्रशिक्षक शेख रहीम सर व त्याच्या मेहनतीचे फळ आहे. ही निवड राजमाता जिजाऊ क्रिकेट अक्ॅडमीमध्ये केलेल्या उत्कृष्ट कामगिरीमुळे शक्य झाली आहे. नुमान शेख याने आपल्या उत्कृष्ट बॉलिंग आणि अष्टपैलू खेळाने निवड समितीला प्रभावित केले. त्याच्या निवडीमुळे स्थानिक क्रिकेट समुदायात आनंदाचे वातावरण आहे. त्याच्या या निवडीमुळे पुन्हा एकदा आष्टीचे नाव क्रिकेट मध्ये उज्वल केले आहे. नुमान शेख याने आष्टी, बीड, छत्रपती संभाजीनगर,




मुंबई, अहिल्यानगर, नाशिक व इतर अनेक ठिकाणी आपल्या अष्टपैलू खेळाचे बहारदार प्रदर्शन करून तसेच चौकार व षटकारांची आतिषबाजी करत क्रिकेटचे मैदाने गाजवले आहेत. आष्टी येथे ए पी एल क्रिकेट स्पर्धेत नुमान ला आपल्या संघात घेण्यासाठी अनेकांची ओढाताण सुरू असते. महागडा खेळाडू म्हणून त्याची ख्याती आहे. नुमान शेख याला राजमाता जिजाऊ क्रिकेट अक्ॅडमीचे प्रशिक्षक शेख रहीम सर तसेच हंबर्डे महाविद्यालयाचे क्रीडा विभागाचे प्रा वनगुजरे सर यांचे मार्गदर्शन लाभत आहे. नुमान शेख यांच्या निवडीबद्दल त्याचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

---

# शासकीय कार्यालयातील कामासाठी स्टॅम्प पेपरची मागणी करू नये

**बीड । प्रतिनिधी**

शासकीय कामकाजासाठी आणि विविध प्रकारच्या प्रमाणपत्रांसाठी मुद्रांक शुल्क माफीचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. शंभर रुपये मूल्यांचे स्टॅम्प पेपर आता रद्दबातल झाल्याने अनेक बाबतीत ५०० रुपये मूल्याच्या स्टॅम्प पेपरची मागणी होते ती यापुढील काळात करण्यात येऊ नये असे स्पष्ट निर्देश व सूचना नोंदणी महानिरीक्षक यांच्या कार्यालयातर्फे जारी करण्यात आल्या आहेत.

महाराष्ट्र शासन महसूल व वन विभागाकडील आधिसूचना क्रमांक मुद्रांक २००४२/ १६६३/ प्र.क्र. ४३६/-१ दिनांक १/७/२००४ अन्वये शासकीय कार्यालयातील जात प्रमाणपत्र/ वास्तव्य प्रमाणपत्र, तसेच राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र या शासकीय कार्यालयासमोर करावयाच्या सर्व प्रकारच्या प्रतिज्ञापत्रावर मुद्रांक अधिनियमातील अनुसूची एक मधील अनुच्छेद -४ अन्वये आकारणी योग्य असलेले मुद्रांक शुल्क माफ केले आहे.

शासन राजपत्र असाधारण क्रमांक ७२ दिनांक १४ ऑक्टोबर २०२४ अन्वये महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाचे परिशिष्ट -एक मधील अनुच्छेदामध्ये सुधारणा करण्यात आली असून अनुच्छेद क्रमांक ४, ५, ८, , २७, ३०, ३८, ४४, ५०, ५२, ५८ मध्ये रुपये १००/- किंवा रुपये २००/- ऐवजी रुपये ५००/- मुद्रांक शुल्क करण्यात आले आहे.

उच्च न्यायालय खंडपीठ छत्रपती संभाजी नगरर यांचे संदर्भ क्रमांक १ च्या आदेशानुसार शासकीय कार्यालयात प्रतिज्ञापत्र सादर करताना नागरिकांकडून मुद्रांकाचा आग्रह करू नये अशा स्पष्ट सूचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच ई-सेवा केंद्रामध्ये नागरिकांकडून सर्व प्रकारच्या प्रतिज्ञापत्रासाठी रुपये १००/- स्टॅम्प पेपरची मागणी करीत असतात. दिनांक १४/ १०/२०२४ च्या शासन निर्णयानुसार ही सेवा केंद्रामध्ये पक्षकाराकडून रुपये ५००/- चे स्टॅम्प पेपरची मागणी केली जात असल्याचे निर्दशनास आले आहे.

---

# जिल्हाभरात तालुका निहाय कामगार सुविधा केंद्र कार्यान्वित

**बीड । प्रतिनिधी**

कामगारांच्या विविध कल्याणकारी योजनांच्या पूर्ततेसाठी जिल्ह्यात तालुका निहाय केंद्राची स्थापना नुकतीच करण्यात आली असून ही सर्व केंद्रीय कार्यान्वित झाले आहेत.

केंद्र शासनाने इमारत व इतर बांधकाम कामगार कामगारांना सुरक्षा, आरोग्य आणि कल्याणकारी तरतुदी साठी इमारत व इतर बांधकाम कामगार ( रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम, १९९६ पारित केलेला असून त्या अंतर्गत महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची शासन अधिसूचना दिनांक ०४ ऑगस्ट २००७ अन्वये स्थापना केलेली आहे. या मंडळांतर्गत बांधकाम कामगारांची नोंदणी, नुतनीकरण तसेच विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येत आहे.

---

# बालकल्याण समितीकडे असलेल्या बालकांचीओळख पटवून ३० जानेवारीपर्यंत घेऊन जाण्याचे आवाहन

**बीड । प्रतिनिधी**

चि.माणिक उत्तरेश्वर यादव जन्म दिनांक १४/०६/२०१४ वय १० वर्ष ०६ महिने रा. सध्याचा पत्ता शांतीवन मुलांचे बालगृह, आर्वी, जि. बीड. बालकाचा रंग काळा सावळा असून डाव्या गालावर तीळ आहे. चि.गणेश रेश्मा पवार जन्म दिनांक ०४/०९/२०१२ वय १२ वर्ष ०३ महिने सध्याचा पत्ता शांतीवन मुलांचे बालगृह, आर्वी, जि. बीड सध्याचा पत्ता रा.पहूर पेठ ता. जामनेर जि. जळगाव. चि..सूर्या रेश्मा पवार दिनांक २२/०४/२०१५ वय ०९ वर्ष ०८ महिने, सध्याचा पत्ता शांतीवन मुलांचे बालगृह, आर्वी, जि. बीड कायमचा पत्ता रा.पहूर पेठ ता. जामनेर जि. जळगाव. चि.राज रेश्मा पवार वय ०६ वर्ष (अंदाजे) सध्याचा पत्ता सुलभा सुरेश जोशी शिशुगृह आर्वी,जि. बीड व कायमचा पत्ता रा.पहूर पेठ ता. जामनेर जि. जळगाव. कु. गंगा रेश्मा पवार जन्म दिनांक २१/०७/२०१३ वय ११ वर्ष ०५ महिने सध्याचा पत्ता शांतीवन मुलींचे बालगृह, आर्वी, जि. बीड. कायमचा पत्ता रा.पहूर पेठ ता. जामनेर जि. जळगाव. कु.जया विदेश उपाध्याय जन्म दिनांक ०१/०२/२०१९ वय ०५ वर्ष ११ महिने सध्याचा पत्ता सुलभा सुरेश जोशी शिशुगृह आर्वी,जि. बीड. चि. स्वदेश विदेश उपाध्याय जन्म दिनांक ०१/०५/२०१७ वय ०८ वर्ष ०३ महिने सध्याचा पत्ता शांतीवन मुलांचे बालगृह, आर्वी, जि. बीड. येथे मा.बालकल्याण समिती, बीड. बातमी प्रसारीत झाल्यापासून ३० दिवसाच्या आत मा. जिल्हा बाल संरक्षण अधिकारी,बीड, मा.बालकल्याण समिती, बीड व शांतीवन मुलांचे बालगृह, आर्वी, जि. बीड. व सुलभा सुरेश जोशी शिशुगृह आर्वी,जि. बीड आणि शांतीवन मुलींचे बालगृह, आर्वी, जि. बीड. तसेच संस्थेच्या पत्यावर अथवा अधीक्षक- मो. क्र.९९२३७७२६९४, ९४२१२८२३५९ फोनवर संपर्क करावा अन्यथा बालकल्याण समिती बालकाबाबत योग्य ते कायदेशीर निर्णय घेतील.

